महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जावक क्रमांक : तंशिविकापु/विवि/Intake approval/२०२४/ 2945 दिनांक : १९.०७.२०२४

**महत्वाचे परिपत्रक:** 19 JUL 2024

प्रति,
प्राचार्य,
**शासकीय, अशासकीय अनुदानित, खाजगी विनाअनुदानित**
**प्रथम व थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या संस्था,**
**पुणे विभाग.**

विषय: **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील पदविका अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत..**

संदर्भ: १) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे परिपत्रक क्र. १०/एडीएम/ Intake approval/२०२४/२०९ दिनांक २२.०५.२०२४.
२) या विभागीय कार्यालयाचे परिपत्रक क्र. तंशिविकापु/विवि/Intake approval/२०२४/२१४४ दिनांक २२.०५.२०२४.

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भिय परिपत्रकान्वये या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी/वास्तुकला पदविका, प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. पदविका औषधनिर्माणशास्त्र एचएमसीटी व सरफेस कोटिंग टेक्नॉलॉजी आणि थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी या विविध पदविका अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता सहभागी संस्थांची अभ्यासक्रम व प्रवेश क्षमतेबाबतची माहिती ऑनलाईन अद्ययावत करुन सादर करणेस सूचित करण्यात आले होते.

पोस्ट एसएससी प्रथम वर्ष अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेमधील केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेमधील प्रवेश अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत १८.०७.२०२४ रोजी समाप्त झाली असून, केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेच्या प्रथम फेरीकरिता प्रवर्गानुसार उपलब्ध जागांचा तपशिल दिनांक २५.०७.२०२४ रोजी प्रसिध्द होणार आहे.

याअनुषंगाने सर्व पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम राबविणा-या संस्थांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील पदविका अभ्यासक्रमांसाठी **शैक्षणिक वर्ष २०२४-२५** करिता संबंधित शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई संलग्नता/समकक्षता प्रदान केल्याची माहिती अद्ययावत करुन **तात्काळ** ऑनलाईन पध्दतीने सादर करावी.

**सदर माहिती प्रवेशासंबंधी असल्याने माहितीची संवेदनशीलता व कालमर्यादा लक्षात घेता ती अचूक असण्याबाबत दक्षता घेण्यात यावी. तसेच वेळेत माहिती न सादर केल्याने केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेच्या प्रथम फेरीमध्ये संस्थेचे नाव न आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेच्या प्राचार्यांची राहील याची नोंद घ्यावी.**

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत:
१) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई (कार्यासन क्रमांक १०)
२) प्रोग्रॅमर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.